# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादीत

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

एस्ट्रेला बॅटरीज एक्सपॅन्शन इमारत,तळमजला,लेबर कॅम्प,
धारावी रोड, माटुंगा (पुर्व) मुंबई -४०० ०१९
दुरध्वनी क्र. ०२२-६९४२५००
ई-मेल -agmhrrc@mahagenco.in वेबसाईट :- www.mahagenco.in


क्र.महानिर्मिती/उपमव्य.(मासं-सेप्र)/०२/२०२५/ No 04732 दिनांक: 27 MAY 2026

## सूचना

**विषय:** जाहिरात क्र.०२/२०२५ अन्वये अतिरिक्त कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ (Addl. Executive Chemist) व उप कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ (Dy Executive Chemist) या पदांच्या कागदपत्रे पडताळणीअंती वैयक्तिक मुलाखत परीक्षेबाबत.

**संदर्भ:-** १) महानिर्मिती जाहिरात क्र.०२/२०२५
२) महानिर्मिती सूचना क्र.०२/२०२५ चे सुधारपत्र क्र.२४७९ दि.३०.०३.२०२५
३) महानिर्मिती सूचना क्र.३३४३ दि.१६.०४.२०२५
४) महानिर्मिती सूचना क्र.५०१५ दि.०५.०६.२०२५
५) महानिर्मिती सूचना क्र.५४१२ दि.१९.०६.२०२५
६) महानिर्मिती सूचना क्र.९९५७ दि.११.११.२०२५

उपरोक्त विषयास अनुसरुन, महानिर्मिती जाहिरात क्र.०३/२०२५ अन्वये अतिरिक्त कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ (Addl. Executive Chemist) व उप कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ (Dy Executive Chemist) या पदांकरीता सरळसेवा जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदरील पदांची ऑनलाईन परीक्षा दि.२९.०६.२०२५ व दि.३०.०६.२०२५ रोजी घेण्यात आली होती. वरील ऑनलाईन परीक्षेत प्राप्त गुणांच्या अनुषंगाने व जाहिरात केलेल्या पदानुसार, उमेदवारांना कागदपत्रे जमा करण्याकरिता दि.१९.११.२०२५ ते दि.२१.११.२०२५ दरम्यान बोलविण्यात आले होते.

महानिर्मिती जाहिरात क्र.०२/२०२५ अन्वये अतिरिक्त कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ (Addl. Executive Chemist) व उप कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ (Dy Executive Chemist) या पदांच्या कागदपत्रे पडताळणीअंती पात्र / अपात्र उमेदवारांची यादी आणि सदरील पदांसाठी कागदपत्रे पडताळणीअंती वैयक्तिक मुलाखत परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी प्राप्त करुन घेण्याकरीता खालील ठिकाणी क्लिक करावे.

**अतिरिक्त कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ (Addl. Executive Chemist) पदाची कागदपत्रे पडताळणीअंती पात्र / अपात्र उमेदवारांची यादी** ↵

**अतिरिक्त कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ (Addl. Executive Chemist) पदाची वैयक्तिक मुलाखत परीक्षेसाठी पात्र उमेदवारांची यादी** ↵

**उप कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ (Dy Executive Chemist) पदाची कागदपत्रे पडताळणीअंती पात्र / अपात्र उमेदवारांची यादी** ↵

**उप कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ (Dy Executive Chemist) पदाच्या वैयक्तिक मुलाखत परीक्षेसाठी पात्र उमेदवारांची यादी** ↵

मा.सक्षम अधिकारी यांच्या मंजुरीनुसार वरील पदांच्या कागदपत्रे पडताळणीअंती वैयक्तिक मुलाखत परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांची **वैयक्तिक मुलाखत परीक्षा दिनांक १६.०६.२०२६ व दि.१७.०६.२०२६ रोजी** पुढील नमूद अटी व शर्तींच्या अधिन राहून पार पाडण्यात येणार आहे.

**अटी व शर्ती :-**

१) उमेदवारांची वैयक्तिक मुलाखत परीक्षेसाठीची पात्रता ही उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांनुसार तसेच उमेदवारांनी सिस्टीम जनरेटेड अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे व महिला आरक्षण इत्यादी बाबतच्या माहितीनुसार ठरविण्यात आली आहे.

२) अतिरिक्त कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ (Addl. Executive Chemist) व उप कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ (Dy Executive Chemist) या पदांच्या वैयक्तिक मुलाखत परीक्षेच्या पात्रता यादीत नाव असल्याने नियुक्तीचे कोणतेही हक्क उमेदवारांकडे राहणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३) अतिरिक्त कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ (Addl. Executive Chemist) व उप कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ (Dy Executive Chemist) या पदांची वैयक्तिक मुलाखत परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधनाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करण्याचा अधिकार महानिर्मिती कंपनीने राखून ठेवलेला आहे.

४) सदरील यादीत नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक देण्याबाबतचा कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही. ही यादी पूर्णत: जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता आणि इतर अटी व शर्ती पूर्ण करण्याच्या अधीन राहून तयार करण्यात आलेली आहे.

५) अयशस्वी/ अपात्र उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचे पत्रव्यवहार महानिर्मिती कंपनीकडे करु नये. उमेदवारांच्या कोणत्याही पत्र व्यवहाराची महानिर्मिती कंपनीकडून दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

६) महानिर्मिती प्रशासकिय परिपत्रक क्र.५०२ दि.१७.०८.२०२२ अन्वये, अंतिम निवडीस पात्र ठरण्यासाठी एकुण गुणांपैकी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना किमान ३०% गुण व मागास प्रवर्गातील उमेदवारांना २०% किमान गुण असणे आवश्यक असेल.

७) वैयक्तिक मुलाखत परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांनी वैयक्तिक मुलाखत परीक्षेस येताना ओळखपत्र (मुळ व स्वसाक्षांकित) आणणे आवश्यक आहे.

८) कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेकरीता बोलविण्यात आलेल्या आणि पडताळणीअंती पात्र ठरलेल्या उमेदवारांची संख्या ही आवश्यक वैयक्तिक मुलाखत प्रमाणापेक्षा जास्त असल्यास, अशा प्रकरणी पात्र उमेदावारांना गुणानुक्रमे वैयक्तिक मुलाखतीस बोलविण्यात आल्याने, कागदपत्रे पडताळणीअंती पात्र ठरलेल्या सर्वच उमेदवारांचा वैयक्तिक मुलाखतीच्या यादीत समावेश नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

९) अतिरिक्त कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ (Addl. Executive Chemist) व उप कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ (Dy Executive Chemist) या पदांच्या वैयक्तिक मुलाखत परीक्षेअंती, प्रशासकिय परिपत्रक क्र.५०२ दि.१७.०८.२०२२ नुसार, ऑनलाईन परीक्षेतील गुणांना ७०% गुणांमध्ये रुपांतरीत करुन तसेच वैयक्तिक मुलाखतीतील गुणांना ३०% गुणांत रुपांतरीत करुन अंतिम निवड / प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

१०) उमेदवारांना कळविण्यात येते की, कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेकरीता १:५ या प्रमाणात उमेदवारांना बोलविण्यात आले होते. त्यानुसार ज्या मागास प्रवर्गातील उमेदवारांना गुणानुक्रमे १:५ या प्रमाणात खुल्या प्रवर्गातून बोलविण्यात आले होते अशा उमेदवारांची वैयक्तीक मुलाखत प्रक्रियेकरीता १:३ या प्रमाणात बोलविलेल्या उमेदवारांच्या यादीत गुणानुक्रमे अथवा उपलब्ध पात्र उमेदवारांचा विचार करता मुळ मागास प्रवर्गातून निवड होऊ शकते. तसेच त्याच धर्तीवर अंतिम निवड यादीत वैयक्तिक मुलाखतीचे गुण (३०% गुण) जोडून अशा उमेदवारांची निवड खुल्या प्रवर्गातून देखील होऊ शकते याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

११) अतिरिक्त कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ (Addl. Executive Chemist) व उप कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ (Dy Executive Chemist) या पदांच्या वैयक्तिक मुलाखत प्रक्रियेस पात्र ठरलेल्या उमेदवारांची दिनांक व वेळनिहाय यादी प्राप्त करुन घेण्यासाठी उमेदवारांनी खालील ठिकाणी क्लिक करावे.

**अतिरिक्त कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ (Addl. Executive Chemist) या पदाची वैयक्तिक मुलाखत परीक्षेकरीता उमेदवारांची तुकडीनिहाय यादी**

**उप कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ (Addl. Executive Chemist) या पदाची वैयक्तिक मुलाखत परीक्षेकरीता उमेदवारांची तुकडीनिहाय यादी**

वैयक्तिक मुलाखत परीक्षा तपशील :-

दिनांक :- १६.०६.२०२६ व १७.०६.२०२६ (कृपया तुकडीनिहाय यादी पहावी)

पदनाम :- अतिरिक्त कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ (Addl. Executive Chemist) व
उप कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ (Dy Executive Chemist)

ठिकाण :- मेसर्स ठाकुर पॉलिटेक्निक, ठाकुर कॉम्पलेक्स, पश्चिम दृतगती मार्गासमोर, कांदिवली (पुर्व), मुंबई-४००१०१

**Venue** :- M/s. Thakur Polytechnic, Thakur Complex, Opposite Western Express Highway, Kandivali (East), Mumbai-400101.

(डॉ.नितीन वाघ)
कार्यकारी संचालक (मासं)
महानिर्मिती